लोकमत

# कृतिशील कार्यक्रमासाठी गांधी यांची पत्रकारिता

## अरुण खोरे : विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : ग्रामस्वराज्य आणि ग्रामस्वच्छता या बाबींना महात्मा गांधी यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून प्राधान्याने देशासमोर आणले. ग्रामीण भारताचे प्रश्न सोडविण्यासाठी कृतिशील कार्यक्रम देण्यात त्यांची पत्रकारिता आघाडीवर होती, असे प्रतिपादन गांधी-विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ज्येष्ठ अभ्यासक खोरे यांचे बीजभाषण झाले. मानव्यविद्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक होते. 'महात्मा गांधी यांची पत्रकारिता आणि तिची प्रस्तुतता' असा या चर्चासत्राचा विषय होता.

खोरे म्हणाले, देश आत्मनिर्भर होण्यासाठी ग्रामीण भारत स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाला पाहिजे. यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी त्यांनी 'हरिजन' या वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणाचे महत्त्वाचे कार्य हाती घेतले. मात्र, गांधीजींच्या या कार्याकडे त्यांच्या समकालीनांनी म्हणावे तितके लक्ष दिले नाही, याची खंत वाटते.

यावेळी नाईक म्हणाले, गांधीजी हे विसाव्या शतकातील एक महान संज्ञापक होते. दक्षिण आफ्रिका असो अगर भारत, या दोन्ही देशांतील सर्वसामान्य, शोषित नागरिकांच्या हक्कांविषयी लढा देण्यासाठी त्यांनी आपली पत्रकारिता पणाला लावली. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, प्रा. मीना देशपांडे, डॉ. राजन गवस, चैत्रा रेडकर, नंदा पारेकर, अवनिश पाटील, व्यंकाप्पा भोसले, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, आदी उपस्थित होते.

यावेळी गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

27 MAR 2018 सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निर्भय मन घडविण्याकडे गांधींचा कल

## अरुण खोरे : शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : राष्ट्रभावनेने प्रेरित निर्भय समाजमन घडविण्याकडे महात्मा गांधी यांच्या समग्र पत्रकारितेचा कल होता, असे प्रतिपादन गांधी विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे यांनी आज येथे केले. सेवाभाव, सत्यकथन व पारदर्शकता ही महात्मा गांधी यांच्या पत्रकारितेची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. आजच्या काळात त्यांच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेची प्रस्तुतता अधिकच अधोरेखित झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे 'महात्मा गांधी यांची पत्रकारिता आणि तिची प्रस्तुतता' विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक अध्यक्षस्थानी होते. मानव्यविद्या सभागृहात चर्चासत्र झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्रात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना अरुण खोरे. शेजारी डावीकडून प्रा. शिवाजी जाधव, ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक, डॉ. भारती पाटील.

श्री. खोरे म्हणाले, ''बौद्धिक प्रामाणिकता आणि विचारांची स्पष्टता यामुळे महात्मा गांधी यांची पत्रकारिता तत्कालीन परिस्थितीत झळाळून पुढे आली. लंडन टाइम्स, डेली मेल आदी दक्षिण आफ्रिकेबाहेरील देशांमधील वृत्तपत्रांना पत्रे पाठवून त्यांनी आफ्रिकेमधील लढा जगभर पोहोचविला. जनमानसाला शिक्षित करण्याचे ध्येय उराशी बाळगून त्यांनी पत्रकारितेचे व्रत हाती घेतले. गांधीजी वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या बाजूचे होते. मात्र हाती आलेल्या सत्तेचा दुरुपयोग करणे मात्र चुकीचे आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.''


ते म्हणाले, ''ग्रामस्वराज्य व ग्रामस्वच्छता पत्रकारितेच्या माध्यमातून देशासमोर आणताना ग्रामीण भारताचे प्रश्न ऐरणीवर आणून ते सोडविण्यासाठी कृतिशील कार्यक्रम देण्यातही गांधींची पत्रकारिता आघाडीवर होती. समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी त्यांनी हरिजन वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणाचे महत्त्वाचे कार्य हाती घेतले.''

श्री. नाईक म्हणाले, ''गांधीजी हे विसाव्या शतकातील एक महान संज्ञापक होते. दक्षिण आफ्रिका असो अगर भारत, या दोन्ही देशांतील सर्वसामान्य, शोषित नागरिकांच्या हक्कांसाठी लढा देण्याकरिता त्यांनी आपली पत्रकारिता पणाला लावली. जे आजच्या पत्रकारितेच्या सद्यःस्थितीची चिंता करतात, त्यांच्यासाठी गांधींच्या पत्रकारितेचे मूल्य मोठे आहे. मात्र ज्याचे त्यांना मोल नाही, त्यांच्यासाठी गांधी अप्रस्तुत ठरतील.''

गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

या वेळी सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, दशरथ पारेकर, प्रा. मीना देशपांडे, डॉ. चैत्रा रेडकर, डॉ. राजन गवस, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2018
सकाळ



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. तेजस गर्गे. शेजारी डॉ. निलांबरी जगताप व डॉ. नंदा पारेकर

# तोफखाना विकासात मराठ्यांची भूमिका महत्त्वाची : डॉ. तेजस गर्गे

कोल्हापूर, ता. २६ : तोफखाना विकासात मराठ्यांची भूमिका महत्त्वाची होती; मात्र यासंदर्भात पुरेसा प्रकाशझोत पडला नसल्याची खंत महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व आणि संग्रहालय संचलनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ आयोजित डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'दुर्ग स्थापत्य आणि संवर्धन, मराठकालीन तोफा आणि दारूगोळा' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या.

डॉ. गर्गे यांनी दुर्ग स्थापत्य आणि संवर्धनासाठी पुरातत्त्व खाते कसे कार्यरत असते ते सांगितले. दुर्गस्थापत्य संदर्भात त्यांनी रायगड, राजगड किल्ल्यांची माहिती दिली. पुरातत्त्वीय विज्ञानाचीही तोंडओळख करून दिली. दख्खन भागातील तोफा तयार करण्याच्या तंत्रज्ञानाचा विकास कसा झाला याबद्दल सविस्तर विवेचन केले. मराठे काळात शिंदे व होळकर कालीन मराठाशैलीतील तोफाबद्दल माहिती दिली. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी आयोजन केले. या वेळी डॉ. अवनिश पाटील. डॉ. अविनाश भाले, डॉ. विशाल पाटील, उदय गायकवाड, डॉ. निलिशा देसाई उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2018
पुढारी

# महात्मा गांधीजींची पत्रकारिता सेवाभाव, सत्यकथनावर आधारित

## शिवाजी विद्यापीठात चर्चासत्रात मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर :** सेवाभाव, सत्यकथन आणि पारदर्शकता ही महात्मा गांधी यांच्या पत्रकारितेची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. आजच्या काळात गांधीजींच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेची प्रस्तुतता अधिकच अधोरेखित झालेली असल्याचा सूर विविध मान्यवर वक्त्यांनी सोमवारी येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने 'महात्मा गांधी यांची पत्रकारिता आणि तिची प्रस्तुतता' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन झाले. यावेळी गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# एसपी अॅकॅडमी, विद्यापीठ संघ विजयी

**कोल्हापूर :** जिल्हा क्रिकेट संघटना आयोजित श्री. श्री. टी-२० क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ आणि एस. पी. क्रिकेट अॅकॅडमी चंदगड संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात केली.

राजाराम कॉलेजच्या मैदानावर शिवाजी विदयापीठ कर्मचारी संघ आणि अण्णा मोगणे सहारा स्पोर्टस अॅकॅडमी क यांच्यात सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ३ बाद १७० धावा केल्या. सागर पोवारने ५४ चेंडूंत ६४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल अण्णा मोगणेने २० षटकांत ९ बाद ११० धावा केल्या. अक्षय वारंगेने ३४ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाकडून सागर पोवारने १६ धावांत पाच गडी बाद केले. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने ६० धावांनी विजयी मिळवला.

दुसरा सामन्यात पॅकर्स क्रिकेट क्लबविरोधात एस. पी. क्रिकेट अॅकॅडमीने १९.४ षटकांत सर्वबाद ९६ धावा केल्या. अमोल जाधवने ३४ धावा केल्या. पॅकर्सकडून राहुल वाघने तीन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल पॅकर्स क्रिकेट क्लबचा डाव ५० धावांतच आटोपला. चंदगडकडून जोतिबा पाटीलने १९ धावांत ५ गडी बाद केले. प्रवीण गावडेने दोन बळी मिळवले. चंदगडने २६ धावांनी विजय मिळवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठ अधिसभेची आज बैठक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची वार्षिक बैठक मंगळवारी राजर्षी शाहू सभागृहात दुपारी बारा वाजता होणार आहे. अधिसभेवर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) सदस्यांनी बहिष्कार टाकला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रश्न रद्द केल्याने हा बहिष्कार टाकण्यात आल्याचे सुटाचे सुधाकर मानकर यांनी स्पष्ट केले. सुटाचे एकूण सात सदस्य अधिसभेत आहेत. हे सदस्य अधिसभा सुरू असताना धरणे आंदोलन करणार आहेत. विद्यापीठाचे अंदाजपत्रक अधिसभेत सादर होईल यासह प्रलंबित प्रश्न आणि नव्या प्रस्तावासंदर्भात जोरकस चर्चा होण्याची चिन्हे आहेत. विविध अधिकार मंडळे अस्तित्वात आल्यानंतरची ही पहिलीच अधिसभा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2018
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात आज अधिसभा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १२ वाजता नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या अधिसभेची पहिलीच सभा मंगळवारी होणार आहे. या सभेमध्ये अंदाजपत्रक आणि हिशेब पत्रके सादर केली जाणार आहेत. दरम्यान, 'सुटा'च्या सदस्यांनी सात ठराव आणि १८ प्रश्न अधिसभेसाठी सादर केले होते. यापैकी चार प्रश्न कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्वीकारले आहेत. त्यामुळे अधिसभेच्या बैठकीवर सुटा सदस्यांनी बहिष्कार टाकला आहे. बैठकीदिवशी सभागृहाबाहेर 'सुटा'चे सदस्य धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती सुटाचे जिल्हा समन्वयक सुधाकर मानकर यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
27 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज अधिसभा

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा उद्या (ता. २७) होत आहे. दुपारी बारा वाजता त्यास सुरुवात होईल. महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टनुसार अधिकार मंडळे निवडली आहेत. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आमने -सामने आहेत. त्याचे पडसाद उमटण्यास सुरवात झाली आहे. 'सुटा'ने अधिसभेवर बहिष्कार टाकला असला तरी उद्याच्या अधिसभेकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

